
# आपल्या शहरातील वाहतुकीच्या समस्या

## आपल्या वाढत्या शहरातील प्रवासाच्या वाढत्या गरजा भागवण्यासाठी काय चांगला पर्याय असू शकेल?

गेल्या चार दशकांत आपल्या शहराची लोकसंख्या चौपट वाढली असून ती आता **चौपट** झाली असून आता ती **२० लाखांवर** पोहोचलेली आहे.



१९८२ मध्ये **८७ चौ.कि.मी.** असलेले शहराचे क्षेत्रफळ **दुप्पटीने वाढून १७७ चौ. कि. मी. झालेले आहे.**

## कामासाठी रोज लांबवर जाणाऱ्या लोकांची संख्या वाढलेली आहे.


## खाजगी वाहने हा यावर उपाय नाही.

२००३ ते २०१३ या काळात खाजगी वाहनांची संख्या ३.५ लाखांवरून ११.५ लाखांवर गेलेली आहे.

शहरातील ७० % वाहतूक ही दुचाकी वाहनांनी होते.



## परिणाम



अपघात

प्रदूषण

वाहतुकीची कोंडी

सार्वजनिक निधी आणि जागेचा वापर अधिकाधिक उड्डाणपूल, रस्ते आणि वाहनतळ बांधण्यासाठी होत आहे.

## यावर कायमस्वरूपी उपाय म्हणजे उच्च प्रतीची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था



© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.

# रेनबो RAINBOW


## बस रॅपिड ट्रांझिट सिस्टीम

## सर्वांसाठी उच्च प्रतीची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था


विकसित शहरांसाठी लोकाभिमुख,
पर्यावरणपूरक आणि किफायतशीर पर्याय



६० गाड्यांतून प्रवास करू शकतील इतके लोक
१ बीआरटी बसमधून प्रवास करू शकतात.



**मेट्रोचे १ कि.मी.** अंतर बनविण्यासाठी येणाऱ्या खर्चात



**बीआरटी बसचे ४० कि.मी**
**अंतर तयार केले जाऊ शकते.**



सर्व **ठिकाणांना जोडू शकणारी**
**बीआरटी** ही
**वेगवान प्रवासी** व्यवस्था आहे.

## महाराष्ट्रात प्रथमच ही व्यवस्था सुरू होत आहे.

## नावीन्यपूर्ण! सक्षम! वेगवान!

© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.

# जगभरातील बीआरटीचा आढावा

**जगभरातील १६० शहरांमध्ये** बस रॅपिड ट्रांझिट सिस्टीम
किंवा हाय क्वालिटी बस कॉरिडॉर अस्तित्वात आहे

२००२ सालापासून अहमदाबाद, इंदोर आणि सुरतसह
**११५ शहरांत बीआरटीएस** अंमलात आणण्यात आली आहे.

या व्यवस्थेमध्ये दररोज एकूण **३ कोटी प्रवाशांची वाहतूक** केली जाते.

## बीआरटीएसच्या पायाभूत सुविधांचे घटक



बससाठी स्वतंत्र मार्गिका




उच्च प्रतीच्या कार्यक्षम बस




उच्च दर्जाची बंदिस्त स्थानके



प्रवासी माहिती यंत्रणा



स्वयंचलित तिकीट सुविधा



टर्मिनल आणि डेपो

© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.

रेनबो RAINBOW

# अशी आहे रेनबो बीआरटी!

## बीआरटी कॉरिडॉर

बसच्या वेगवान वाहतुकीसाठी स्वतंत्र मार्गिका

बससाठी मध्यभागी असलेल्या स्वतंत्र मार्गिकेमुळे इतर वाहने, सायकलस्वार आणि पादचारी यांचा अडथळा नाही. जागोजागी असलेल्या इमारतींच्या प्रवेशद्वारांजवळ बसला वेग कमी करण्याची गरज भासणार नाही.




© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.

रेनबो RAINBOW

# अशी आहे रेनबो बीआरटी!

## बीआरटी स्थानके

बसस्थानके रस्त्याच्या मधोमध असल्याने दोन्ही दिशांना जाणाऱ्या बससाठी उपयुक्त ठरतील.

आपल्या प्रवासाचे पूर्वनियोजन करणे शक्य.

आपले तिकीट बसस्थानकातच विकत घेता येईल.

स्मार्ट कार्डमुळे तिकीट काढणे सहज आणि सोपे.

आपल्याला हव्या असलेल्या बसचे वेळापत्रक पाहणे सोपे







अंध किंवा कर्णबधीर प्रवाशांना वापरण्यास सहज-सोपे

बस थांब्यावर बस थांबल्यावर दारे उघडतात

बसमध्ये चढ - उतार करणे सुरक्षित आणि जलद आहे

एकाच बसस्थानकातून अनेक मार्गांवरील बसमध्ये जाणे शक्य


© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.

रेनबो RAINBOW

# अशी आहे रेनबो बीआरटी!

## बीआरटी बसेस

बीआरटीसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष बसमध्ये दोन्ही बाजूंना दरवाजे असून त्या बीआरटी मार्गांवर तसेच इतर मार्गांवरही धावू शकतात.






डाव्या बाजूच्या दाराचा वापर
नेहमीच्या बसथांब्यांवर केला जाईल.



उजव्या बाजूच्या मोठ्या दाराचा उपयोग बीआरटी बसस्थानकात
अनेक प्रवाशांना एकाच वेळी चढण्या-उतरवण्यासाठी केला जाईल.



पुढील स्थानकाचे नाव एलईडी फलकावर पाहता येईल तसेच त्याची उद्घोषणादेखील केली जाईल.



बसमध्ये व्हीलचेअर (चाकांची खुर्ची) चढवण्याची व्यवस्था आहे



बीआरटीएस नियंत्रण कक्ष जीपीएस यंत्रणेच्या मदतीने बस वाहतुकीचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करू शकेल.



बसमध्ये बसण्यासाठी तसेच उभे राहण्यासाठी पुरेशी जागा असेल तसेच बसचा आतील भाग समपातळीत, आरामदायक ठेवण्यात येईल.

© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.


रेनबो RAINBOW

# अशी आहे रेनबो बीआरटी!

## संपूर्ण शहराशी जोडलेले मार्ग

## पुणे महानगर क्षेत्रातील नियोजित ११५ कि.मी. लांबीचे बीआरटीचे जाळे

## जगातील काही सर्वात मोठ्या बीआरटी व्यवस्थांपैकी एक आहे.




| ४ मार्ग | ४५ कि. मी. | ९० बीआरटी स्थानके |
|---|---|---|

## महत्त्वाच्या सर्व ठिकाणांना जोडणारी व्यापक सेवा

© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.

रेनबो
RAINBOW

# रेनबो बीआरटीचा वापर कसा करावा




## सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी ११ मार्गदर्शक सूचना

१. मार्ग आणि वेळापत्रक यांच्या माहितीसाठी फोन/इंटरनेट/छापील पुस्तिका यांचा उपयोग करा.

२. आपल्या जवळच्या बीआरटी स्थानकात जा किंवा जोडमार्गावरील बसचा वापर करा.

३. बसस्थानकापर्यंत जाण्यासाठी रस्ता ओलांडताना पादचाऱ्यांसाठी असलेल्या सुविधांचा वापर करा.

४. तिकीट विक्री केंद्रात जाऊन तिकीट काढा किंवा फ्लॅप गेटवर स्मार्ट कार्डचा वापर करा.

५. फ्लॅप गेटने बसस्थानकात प्रवेश करा.

६. बसच्या वेळापत्रकाबद्दल जाणून घेण्यासाठी बसस्थानकात लावण्यात आलेल्या फलकांची मदत घ्या.

७. बसस्थानकातील दरवाजासमोर बस थांबल्यानंतरच बसमध्ये चढा.

८. पुढील बसथांब्याविषयीची माहिती बसमध्ये दर्शविली आणि उद्घोषित केली जाईल.

९. आपल्या इच्छित बसस्थानकात उतरा.

१०. जर आपल्याकडे स्मार्ट कार्ड असले तर बाहेर जाण्याच्या फ्लॅप गेटवर त्याचा वापर करा अथवा आपल्याला मार्ग बदलायचा असल्यास बसस्थानकातच थांबा.

११. रस्ता ओलांडताना पादचाऱ्यांसाठी असलेल्या विशेष मार्गाचा वापर करा.

१२. आपल्या इच्छित स्थळी पायी जा अथवा जोडमार्गावरील बसचा वापर करा.

© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.

रेनबो RAINBOW

# रेनबो बीआरटीचे फायदे

## प्रवाशांसाठी तात्कालीन फायदे





- बसचा आरामदायक प्रवास
- सर्व सोयींनी युक्त बसस्थानके
- सर्व मार्गांवर जास्त वारंवारितेने उपलब्ध होणाऱ्या बसेस
- प्रवासाचा वेळ आणि खर्च यांत बचत
- शहरातील सर्व ठिकाणांना जोडलेली व्यवस्था




## शहरासाठी फायदे

- वाहनामुळे होणाऱ्या प्रदूषणात घट
- वाहतुकीच्या कोंडीत घट
- उड्डाणपूल, वाहनतळ यांच्या बांधकामावर होणाऱ्या खर्चात कपात
- बसच्या व्यापक जाळ्यामुळे आर्थिक कारभारांना गती

© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.

रेनबो
RAINBOW

# रेनबो बीआरटी आणि तुम्ही

## आपल्या आणि सहप्रवाशांच्या सोयीसाठी खालील बाबींचे पालन करा



### वाहन चालकांसाठी सूचना

- बीआरटीएसच्या मार्गात प्रवेश निषिद्ध आहे.
- बीआरटीएस बसस्थानकांच्या जवळ असणाऱ्या गतिरोधकांजवळ वेग कमी करा.
- पादचारी आणि सायकलस्वार यांना प्राधान्य द्या.
- कोणत्याही मार्गात प्रवेश करताना अथवा बाहेर पडताना वेग मर्यादित ठेवा.
- बस आणि इतर वाहनांच्या एकत्रित मार्गांवर बसला ओलांडून पुढे जाऊ नका.
- चौकामध्ये बसला पुढे जाण्याची संधी द्या
- शक्य तेथे बीआरटीएसचा वापर करा
- जवळच्या अंतरावर जाताना पायी जा किंवा सायकलचा वापर करा



### पादचाऱ्यांसाठी सूचना

- आपल्या सुरक्षिततेची काळजी घ्या, वाहतुकीचे नियम पाळा
- रस्त्यावरून चालताना अथवा रस्ता ओलांडताना पादचाऱ्यांसाठी राखीव असणाऱ्या मार्गांचा वापर करा.



### बीआरटीएसच्या प्रवाशांसाठी सूचना

- बीआरटीएस स्थानकात जाण्यासाठी पादचाऱ्यांसाठी असलेल्या राखीव मार्ग, पूल अथवा भुयारी मार्ग यांचा वापर करा.
- बीआरटीएस बसस्थानक हा बसमध्ये चढण्याचा योग्य आणि सुरक्षित पर्याय आहे.
- बसच्या मार्गातून पायी जाऊ नका.
- आपले तिकीट बसस्थानकात विकत घ्या
- बसस्थानकात आलेल्या बसमध्ये चढताना स्वयंचलित दरवाजे उघडेपर्यंत वाट पहा.
- आपण चढण्याआधीच बसचे दरवाजे बंद झाले तरी चिंता करू नका, पुढील बस लवकरच येईल.
- विशेष गरजा असणाऱ्या प्रवाशांना प्राधान्य द्या.
- बसस्थानके स्वच्छ ठेवण्यासाठी मदत करा (थुंकणे/कचरा टाकणे निषिद्ध आहे)

© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.

# बीआरटीएस बस, बसस्थानके आणि कर्मचाऱ्यांच्या गणवेशावर आपणास रेनबोचे चिन्ह दिसेल.

## रेनबो
## RAINBOW




२००८ साली पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सार्वजनिक वाहतूक सक्षम आणि शाश्वत करण्याच्या उद्देशाने बीआरटी प्रकल्पाची सुरुवात केली.

- स्वतंत्र मार्गिका
- नवीन बसेस
- आकर्षक बसस्थानके
- भरपूर वारंवारिता असणारे मार्ग
- पादचारी आणि सायकलस्वार यांच्यासाठी उच्च दर्जाचे मार्ग
- प्रवाशांसाठी माहिती व्यवस्था आणि वाहन मार्ग प्रणाली (tracking system)
- स्मार्ट कार्ड्स
- टर्मिनल आणि जोडमार्ग व्यवस्था
- पुणे बीआरटीशी संलग्न

2014 | 2015 Launch of BRT Corridors | 2016

**नियोजित ११५ कि.मी., जगातील सर्वात मोठ्या बीआरटीएस व्यवस्थांपैकी एक**


**अधिक माहितीसाठी:** जनसंपर्क अधिकारी

बीआरटीएस कक्ष, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., शंकरशेठ मार्ग, स्वारगेट, पुणे ४११०४२, दूरध्वनी : ०२०-२०२४१००६

ईमेल : ceopmpml@gmail.com, mailto:ceopmpml@gmail.com संकेतस्थळ : www.pmpml.org http://www.pmpml.org



© Government of India, Ministry of Urban Development, Developed by IBI Group and Center for Environment Education, as a part of BRTS Promotion and Outreach Program. November 2014.